(Title Code :- MAHMAR52287)

# साप्ताहिक दक्ष जळगाव

जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक, मुंबई, अहमदनगर, छत्रपती संभाजी नगर, नांदेड, बुलढाणा येथे प्रसिध्द होणारे

संपादक : राजेंद्र सुकलाल मिस्त्री (निकम) मो. ९४२२७७७५६६ http://www.dakshjalgaon.com Email:dakshjalgaonnews@gmail.com उपसंपादक : विकास निंबा पाथरे

वर्ष – २ | अंक – ०७ | दि. ३०-०४-२०२४, वार – मंगळवार | किंमत – २/- रुपये | पाने – ४

आजचे सुविचार


जीवनातील चढाई शिखरावर पोहोचवते, पण सौंदर्य त्या वाटेतल्या फुलांमध्ये दडलेलं असतं. थांबून, पाहून जा.

## कालनियोजन पंचांग


आजचे दाते पंचांग नुसार
वार मंगळवार दि ३०/०४/२०२४
विक्रम संवत २०८० शालिवाहन शके १९४६

| | | |
|---|---|---|
| संवत्सर | क्रोधीनाम | |
| तिथी | षष्ठी/सप्तमी | ०७/०५, २९/४६ |
| नक्षत्र | उत्तराषाढ | |
| योग | साध्य | २२/२३ |
| करण | विष्टी | १८/२८ |
| राशी | मकर | १०/३६ नंतर |
| नावे | भो, जा, जी, खी, खू, खे, खो, गा, गी | |
| र.उदय | | ६/१२ |
| र.अस्त | | १८/५९ |

संपर्कसाठी पता – बी. आर. जोशी, ८२, शनिपेठ शनिमदीरामागे जळगाव मो नंबर ८००७९१५८१५
आपला दिवस आनंदात जावो
''जय श्रीराम''




## जळगाव, रावेर मतदार संघातील लढतींचे चित्र स्पष्ट
## जळगावात ६, तर रावेरातून ५ उमेदवारांची माघार



दक्ष जळगाव, प्रतिनिधी
जळगाव

जळगाव - जळगाव जिल्ह्यातील रावेर आणि जळगाव लोकसभेसाठी अर्ज माघार घेण्याचा आज (दि २९) चा शेवटचा दिवस आहे. दरम्यान, माधारीच्या अंतिम दिवशी जळगाव लोकसभा मतदारसंघात सहा अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली तर रावेरातून पाच अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली. यानंतर आता जळगाव लोकसभेमध्ये एकूण १४ तर रावेरमधून २४ उमेदवार हे निवडणुकीच्या रिंगणात असून दोन्ही मतदार संघातील लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे.

सध्या जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या प्रचाराला वेग आला आहे. १३ मे रोजी जळगाव आणि रावेरमधील निवडणूक पार पडणार आहे. दरम्यान, जळगाव व रावेर लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना अर्ज माघारी घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. माधारीच्या अंतिम दिवशी जळगावमधून सहा अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली आहे. यानंतर आता जळगाव लोकसभेत भाजपच्या स्मिताताई वाघ, शिवसेना ठाकरे गटाचे करण पवार यांच्यासह एकूण १४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत जळगाव लोकसभेतून संजय एकनाथ माळी, रोहित दिलीप निकम, लक्ष्मण गंगाराम पाटील, डॉ. प्रमोद हेमराज पाटील, संग्रामसिंह सुरेश सूर्यवंशी व प्रदीप शंकर आव्हाड या अपक्ष सहा उमेदवारांनी माघार घेतली आहे. दुसरीकडे रावेर लोकसभेमधून पाच उमेदवारांनी माघारी घेतली आहे यामुळे आता येथून भाजप उमेदवार रक्षा खडसे, महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीराम पाटील व बहुजन समाज पार्टी या तीन प्रमुख पक्षांच्या उमेदवारांसह एकूण २४ उमेदवार हे निवडणुकीच्या रिंगणात असल्याचं स्पष्ट झाला आहे. रावेर लोकसभा मतदारसंघातून शेख रहब युसुफ, राहुल रॉय अशोक मूळे, नितीन प्रल्हाद कांडेलकर, शेख कुर्बान शेख करीम. नाजमीन शेख रमजान या ५ अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली आहे

## जिल्ह्याच्या विकासासाठी एक संधी आम्हालाही द्या
## करणदादा पाटील यांचे मतदारांना आवाहन

दक्ष जळगाव, प्रतिनिधी
जळगाव


जळगाव : भाजपाने २०१४ ची निवडणूक १५ लाख रुपये आणि भ्रष्टाचार या मुद्यांवर चालविली. त्यानंतर २०१९ ला पुलवामा आणि आता देश-विदेशाच्या मुद्यावर चालविली जात आहे. परंतु, मला देश-विदेशाच्या मुद्द्यांवर हायफाय भाषणं करून गल्लीचे प्रश्न संपवायचे नाहीत. जळगाव लोकसभा मतदार संघात तुम्हीच भाजपाला एक-दोन नव्हे तर ३०-४० वर्षे संधी दिली. आता एक वेळ आम्हालाही संधी द्या, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला संधी द्या, असे आवाहन महाविकास आघाडीचे जळगाव लोकसभा मतदार संघाचे उमेदवार करणदादा पाटील यांनी केले.जळगाव शहरातील उस्मानिया पार्क येथे महाविकास आघाडीच्यावतीने कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी ते बोलत होते, यावेळी व्यासपीठावर शिवसेनेचे संपर्कप्रमुख संजय सावंत, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष एजाज मलिक, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मुफ्ती हारून नदवी, माजी महापौर जयश्री महाजन, माजी उपमहापौर कुलभूषण पाटील, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष विष्णू भंगाळे, महानगरप्रमुख शरद तायडे, उपमहानगर प्रमुख प्रशांत सुरळकर, गणेश गायकवाड, सलीम इनामदार, महानगराध्यक्ष अशोक लाडवंजारी, डेबुजी फोर्सचे अध्यक्ष सागर सपके, शिवसेनेचे विभाग प्रमुख अण्णा भोईटे, माजी नगरसेवक इब्राहिम पटेल, शकील बागवान, राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष गौरव वाणी, आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष अमृता नेरकर,माजी नगरसेवक सुनील माळी यांसह पदाधिकारी उपस्थित होते.

करणदादा पाटील पुढे बोलतांना म्हणाले की, मशाल ही अंधाराकडून उजेडाकडे नेणारी आहे, मशाल ही माजलेल्या रावणाची लंका जाळणारी आहे, मशाल ही अन्यायाविरुद्ध लढणारी आहे. शिवसेनेला एकदा संधी देऊन पहा, आम्ही कुणाचीच मोगलाई, कुणाचीच मस्ती, कोणाचाच माज या ठिकाणी चालू देणार नाही. तुम्ही आज जशी साथ दिली, तशी साथ मी कायमस्वरूपी देईल, असे आश्वासन देखील त्यांनी यावेळी दिले.

सभेपूर्वी महाविकास आघाडीच्यावतीने प्रभाग २ मध्ये प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी नगरातील छत्रपती शिवाजी महाराज यांना माल्यार्पण करून रॅलीला सुरुवात करण्यात आली. अमर चौक, साळुंखे चौक, बोहरा मस्जिद, रॉकेल डेपो, कोरडे गल्ली, हनुमान मंदिर, शिव मंदिर, मोठा मुंजोबामार्गे उस्मानिया पार्क येथे या रॅलीचा समारोप करण्यात आला. या ठिकाणी या रॅलीचे रूपांतर कॉर्नर सभेत करण्यात आले. रॅलीत प्रभाग २ मधील नागरिकांनी फटाक्यांची आतषबाजी आणि ठिकठिकाणी औक्षण करणदादा पाटील स्वागत केले.



## जळगावात तापमानाचा तडाखा वाढणार



जळगाव - राज्यावर असलेलं अवकाळी पावसाचं सावट आता काही प्रमाणात घटलं असून बहुतांश ठिकाणी उष्णतेत मोठी वाढ होण्याची चिन्हे आहेत. दरम्यान, जळगावात देखील तापमानाचा तडाखा वाढला असून आग ओकणाऱ्या उष्णतेमुळे नागरिकांच्या अंगाची काहिली होत आहे. यातच उद्या म्हणजेच ३० एप्रिलपासून तापमानात वाढ होण्याचे संकेत मिळत आहेत

सध्या जिल्ह्यात उन्हाच्या तीव्रतेत वाढ झाली आहे. यातच वाढलेला उकाडा आणि उष्णतेच्या झळांमुळे जळगावकर प्रचंड हैराण आहेत. गेल्या तीन दिवसांपासून चाळिशीपार आणि शनिवारी ४३.९ अंश असलेल्या तापमानात आज रविवारी काही प्रमाणात घट येणार आहे. रविवारी जिल्ह्यात ठिकठिकणी ढगाळ वातावरण राहील; पण आद्रता वाढणार असल्यामुळे उकाडा देखील वाढणार आहे. त्यामुळे चटका लगाण्याऐवजी घामाच्या धारा निघतील. २९ एप्रिलपासून तापमानात वाढ होण्याचे संकेत मिळत आहेत

त्यामुळे मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जिल्ह्यात उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता आहे. ३० एप्रिल ते ५ मे या कालावधीत जिल्ह्यात पावसाची शक्यता नाही. सध्या किमान तापमानात देखील वाढ झाल्याने रात्रीचाही उकाडा जाणवत आहे.

## नरेंद्र मोदी पुण्यात येऊन म्हणाले, 'पुणे तिथे काय उणे'



पुणे लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचाराच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज पुण्यात जाहीर सभा पार पडली. यावेळी त्यांनी पुण्याचं महत्त्व सांगत असताना 'पुणे तिथे काय उणे' या म्हणीचा उल्लेख केला.

या भूमीने महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यासारखे अनेक संतसुधारक देशाला दिले आहेत. आज ही भूमी जगाला चांगले शास्त्रज्ञ, उद्योजक देत आहे. पुणे जितकं प्राचीन आहे, तितकीच भविष्याच्या बाबतीत ताकदवान आहे. पुण्यात प्रत्येक क्षेत्राचे तज्ज्ञ उपस्थित आहेत. त्यामुळेच म्हणतात पुणे तिथे काय उणे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या भाषणात म्हणाले.

काँग्रेसने देशात ६० वर्षांपर्यंत राज्य केलं. पण काँग्रेसच्या सत्ताकाळात देशातील अर्ध्यापेक्षा जास्त जनतेकडे मुलभूत सुविधा नव्हत्या. आम्हाला तर आता फक्त १० वर्षे तुमची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. पण या १० वर्षात आम्ही मुलभूत गरजांना पुर्ण केलं आहेच, सोबत प्रत्येक वर्गाची आकांक्षा पूर्ण करायला जीव ओतून काम केलं आहे. आवश्यकता आणि आकांक्षा दोन्हींच्या पूर्ततेसाठी एक व्हिजन घेऊन पुढे जात आहोत, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

तुम्ही सुद्धा जाणता, कुणी शहरात राहा, किंवा गावात, चांगले रस्ते बघून, आधुनिक इन्फ्रास्ट्रक्चरला बघून मन प्रसन्न होतं. मेहनत तुम्हालाही करावी लागेल. आधुनिक इन्फ्रास्ट्रक्चरने आपल्याला विश्वास निर्माण होतो. इथे पुणे मेट्रो पाहा, पुणे विमानतळाचं पालटलेलं नवं रुप पाहा, पालखी मार्ग पाहा, समृद्धी महामार्ग बघा, प्रत्येक जागेला कनेक्ट करणारी सेमी हायस्पीड वंदे भारत ट्रेन बघा, हे सर्व आधुनिक होणाऱ्या भारताची प्रतिमा आहे. जीवंत पुरावा आहे. पुणेकरांनो लिहून घ्या, महाराष्ट्राच्या माझ्या बंधू-बघिणींनो ही मोदीची गॅरंटी आहे, तो दिवस येणारच आहे, जेव्हा तुम्ही देशाच्या पहिल्या बुलेट ट्रेनने प्रवास करणार, असं आश्वासन नरेंद्र मोदींनी दिलं.

'१० वर्षात भारतीय युवकांनी सव्वा लाखापेक्षा जास्त स्टार्टअप बनवले'

काँग्रेसने आपल्या १० वर्षात इन्फ्रास्ट्रक्चरवर जेवढा खर्च केला, पुणे कोणतीच गोष्ट विसरत नाही. आकडा लक्षात ठेवा. डॉ. मनमोहन सिंह यांचं जे रिमोटवालं सरकार होतं त्या सरकारने १० वर्षात इन्फ्रास्ट्रक्चरवर खर्च केला तेवढा खर्च आम्ही १ वर्षात करतो. आजचा भारत आपल्या

(उर्वरित पान २ वर)

## गेल्या दहा वर्षात निष्क्रिय खासदार म्हणून खासदार रक्षा खडसे प्रसिद्ध आहेत का? नागरीक

भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार आणि खासदार रक्षा खडसे यांच्या विरोधात मतदारसंघात आक्रोश आणि असंतोष अनेक ठिकाणी विचारला जातो आहे जाब



दक्ष जळगाव, प्रतिनिधी
जळगाव

रावेर लोकसभा मतदारसंघातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या दहा वर्षे खासदार असलेल्या उमेदवार रक्षा खडसे यांच्या प्रचारा दरम्यान मतदार त्यांना विकास कामा संदर्भात प्रश्न विचारून धारेवर धरत आहेत. मतदारसंघात कोणती कामे आपण व्यक्तिगत लक्ष घालून केलीत असा प्रश्न त्यांना विचारून त्रस्त केले जात आहे. यावर रक्षा खडसे ही निरुत्तर होऊन आल्या पावली माघारी फिरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

चोपडा तालुक्यातील धानोरा येथे शनिवारी असा प्रकार घडल्यानंतर आज रविवारी रावेर तालुक्यातील कोचूर येथेही असाच प्रकार घडला आहे. याबाबतची एक व्हिडिओ क्लिप व्हायरल झाली असून त्यात नागरिक खासदार रक्षा खडसे यांना मतदारसंघात केलेली कोणतीही चार विकास कामे सांगा असा प्रश्न पुन्हा पुन्हा विचारताना दिसत आहेत. यावर भाजपच्या सोबत असलेल्या कार्यकर्त्यांनी त्या मतदारांची कशीबशी समजूत काढली आणि रक्षा खडसे आल्या पावलीच परत गाडीत बसल्या अशी व्हिडिओ क्लिप विविध समाज प्रसार माध्यमांवर व्हायरल झाली आहे.

गेल्या दहा वर्षात निष्क्रिय खासदार म्हणून खासदार रक्षा खडसे प्रसिद्ध आहेत. केवळ ठिकठिकाणी सिमेंटचे बाकडे आणि हायमास्ट दिवे लावण्याचे काम त्यांनी फक्त केले आहे. यामुळे मतदार संघात त्यांच्याविरुद्ध प्रचंड असंतोष असून ठिकठिकाणी त्यांना धारेवर धरल्याचे प्रकार घडत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीराम दयाराम पाटील यांनाच आता संधी देऊ असा मतदारांचा कल प्रचारात असल्याचे भाजपच्या कार्यकर्त्यांनाही आढळून येत आहे.

## महायुतीच्या तथा भारतीय जनता पार्टीचे उमेदवार डॉ. हिनाताई गावित यांचा नवापूर शहरात प्रचार दौरा

दक्ष जळगाव, प्रतिनिधी
सुरेश बोरसे, नंदुरबार

नंदुरबार - महायुतीच्या तथा भारतीय जनता पार्टीचे उमेदवार डॉक्टर हिनाताई गावित यांनी आज प्रचाराच्या दुसऱ्या दिवशी नवापूर शहर पिंजून काढले. नवापूर शहरातील जुन्या आणि नव्या प्रत्येक वसाहतीत प्रचार फेरी काढून त्यांनी मतदार बंधू भगिनींना आवाहन केले.

उमेदवार डॉक्टर हिनाताई गावित यांच्या समवेत माजी आमदार शरद गावीत, डोकारे आदिवासी सहकारी साखर कारखाना चेअरमन भरत गावीत, जि.प महिला बालकल्याण सभापती संगिता गावीत, भाजपचे अल्पसंख्याक मोर्चाचे उपाध्यक्ष एजाज शेख यांनी या प्रचार फेरीचे नेतृत्व केले. नवापूर शहरातील मंगलदास पार्क जनता पार्क मुख्य बाजारपेठ यासह सर्व नव्या जुन्या वसाहतींमधून प्रचार फेरी काढण्यात आली त्याप्रसंगी



प्रमुख चौकात तसेच अनेक ठिकाणी गृहिणींनी उत्स्फूर्तपणे उमेदवार डॉक्टर हिनाताई गावित यांचे औक्षण केले तर काही ठिकाणी फुलांचा वर्षाव करून स्वागत करण्यात आले. गरीब कष्टकऱ्यांच्या वसाहतीमध्ये थांबून काही ठिकाणी डॉक्टर हिनाताई गावित यांनी संवाद केला. या प्रचार फेरीत राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष अमृत लोहार, भाजपचे तालुका अध्यक्ष सत्यानंद गावीत,तालुका उपाध्यक्ष जतनसिंग वसावे,अजय गावीत,भाजपचे माजी शहर अध्यक्ष प्रणव सोनार,शहर अध्यक्ष दिनेश चौधरी ,जयेंद्र चव्हाण,,निलेश देसाई,माजी नगरसेवक महेंद्र दुसाने,चंद्रकांत नगराळे,अनिल दुसाने,जगदीश जयस्वाल,सत्यपाल वसावे,राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष शरद पाटील, इंद्रीस टिनवाला,इलेश गावीत,मनोज वळवी,भाजपचा जिग्नेश राणा,सविता जयस्वाल,माजी नगरसेविका सुनिता वसावे,जितेंद्र अहिरे,भीमसिंग पाडवी ,निलेश प्रजापत,सौरव भामरे,जिवन गावीत,सप्नील मिस्त्री, शंभु सोनार, हेमंत शर्मा, गोपी सेन,शुभम पाटील सह भाजपा महायुतीचे पदधिकारी उपस्थित होते

## संपादकीय...

# मतदारांतील उदासीनतेमुळे राजकीय पक्ष काळजीत




महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या दोन टप्प्यांत झालेल्या मतदानाचा घसरलेला टक्का कोणाच्या फायद्या-तोट्याचा ठरेल, हा सध्या पक्षापक्षांतील तथाकथित 'चाणक्य' आणि राजकीय विश्लेषकांपासून सामान्य मतदारांपर्यंत सर्वांच्या चर्चेचा विषय आहे. तर दुसरीकडे सर्वच पक्षांबरोबर तो निवडणूक आयोगाच्याही चिंतेचा मुद्दा बनला असून, पुढच्या टप्प्यांत जोरदार मतदान व्हावे यासाठी आयोगाने कंबर कसली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील पाच मतदारसंघांत मतदान झाले. या टप्प्यात सुमारे ५५.२९ टक्के मतदारांनी आपला मताधिकार बजावला. दुसऱ्या टप्प्यात राज्यातील बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी हे आठ लोकसभा मतदारसंघ निवडणुकीस सामोरे गेले. यावेळी मात्र आधीच्या टप्प्यापेक्षा अधिक मतदान झाले. दुसऱ्या टप्प्यात सुमारे ५९.६३ टक्के लोकांनी मतदान केले. राजकीय विश्लेषक आणि अभ्यासकांकडून याची विविध कारणे दिली जात आहेत. त्यानुसार, राज्यात सध्या अंगाची काहिली करणारा उन्हाळा सुरू आहे. काही ठिकाणी उष्मालाट आहे. त्यामुळे मतदार घराबाहेर पडले नाहीत. त्याचबरोबर यावेळी एक उष्मालाट सोडली तर कोणतीही लाट नाही. राजकारणाचा घसरलेला स्तर, प्रचारातील कमालीची असभ्यता आणि अशिष्टता, पक्षफोडीचे प्रकार याविषयीची सुजाण नागरिकांच्या मनातील घृणा अशा विविध बाबींचा परिपाक म्हणून यंदाचा मतटक्का घसरला, असे सांगण्यात येत आहे. याचा फटका कोणाला बसेल याची जोरदार चर्चा सर्वत्र आहे.

निवडणुकीच्या आकडेशास्त्रानुसार, प्रस्थापितांविरोधी लाट असते, त्यावेळी मोठ्या प्रमाणावर मतदान होते. अशी लाट नसते, तेव्हा ते कमी होते. ज्या ठिकाणी कमी मतदान झाले अशा मतदारसंघांत रालोआला (भाजप व मित्रपक्ष) याचा फायदा झाला, तर जेथे मतदानाचा टक्का वाढला, तेथे काँग्रेस व मित्रपक्षांना लाभ झाला. प्रत्येक निवडणूक वेगळी असते, त्यातील मतदारांसाठीचे मुद्दे वेगळे असतात, म्हणून कोणत्याही निवडणुकीविषयी आधीच ठाम निष्कर्ष काढणे, हे अयोग्य असते. या वेळच्या घसरलेल्या मतटक्क्याचा नेमका अर्थ निकालाच्या दिवशीच समजेल.

## उर्वरित बातम्या...पान १ वरुन

### नरेंद्र मोदी पुण्यात येऊन..........

युवकांचे संशोधन, टॅलेंट आणि टेक्नॉलिजवर विश्वास ठेवून पुढे जात आहे. स्टार्टअप इंडियाचं कमाल पाहा, फक्त १० वर्षात भारतीय युवकांनी सव्वा लाखापेक्षा जास्त स्टार्टअप बनवले आहेत. गर्वाची बाब म्हणजे यापैकी अनेक हे आपल्या पुण्यातील तरुण आहेत, अशी माहिती नरेंद्र मोदींनी दिली.

'संशोधन करणाऱ्या तरुणांना १ लाख कोटी रुपये'

आम्ही जे नीतीनुसार बदल केले आहेत त्याचा परिणाम मॅपिंगच्या क्षेत्रात बघायला मिळत आहेत. माझ्या देशाचे तरुण त्यात पुढे जात आहेत. अवकाश, सुरंक्षा विभाग, उद्योग अशा विविध विभागात प्रगती सुरु आहे. पुण्यात बुद्धिमान तरुण आहेत. आम्ही १ लाख कोटी रुपये, जे लोक इनोवेशन करु इच्छित आहेत त्यांना डोळे झाकून देण्याचा निर्णय घेतला आहे. देश जगातही आपली चमक दाखवत आहे, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

१० वर्षांपूर्वी भारतात मोबाईल आयत करावे लागायचे. पण आता भारत आज जगातला दुसरा सर्वात मोठा निर्यातदार देश बनला आहे. मेड इन इंडिया चिप्सने जगातल्या गाड्या चालताना दिसतील आणि माझं पुणे शहर तर ऑटोमोबाईल हब आहे. आता आम्ही भारताला इलेक्ट्रिक वेहिकलचा हब बनताना बघू. भाजपचा संकल्प हा भारताला सेमी कंडक्टर हब, इनोवेशन हबमध्ये बनवण्याचा आहे. भारतात हायड्रोजन हब बनवण्याचता संकल्प आहे. हे आमचं पहिलं असं सरकार आहे ज्याने सर्वसामान्य नागरिकांचा विचार केला आहे, असा दावा नरेंद्र मोदींनी केला.

## चौथ्या टप्प्यात राज्यात २९८ उमेदवार निवडणूक रिंगणात




मुंबई, दि. २९ : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात राज्यातील ११ मतदारसंघात नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. यात ३६९ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले होते. त्यातील ७१ उमेदवारांनी माघार घेतल्याने आता २९८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

चौथ्या टप्प्यातील अंतिम निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या : नंदुरबार ११, जळगाव १४, रावेर २४, जालना २६, औरंगाबाद ३७, मावळ ३३, पुणे ३५, शिरुर ३२, अहमदनगर २५, शिर्डी २०, बीड ४१ अशी आहे. या ११ मतदारसंघांमध्ये १३ मे रोजी मतदान होणार आहे

# मतांचा जोगवा मागायला जाणाऱ्या राजकिय पक्षांच्या नेत्यांना जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागते

नाशिक : - जिल्ह्यात रणरणत्या उन्हासोबत राजकीय वातावरण तापायला सुरवात झाली आहे. सत्ताधारी-विरोधकांकडून एकमेकांवर वार-पलटवार केले जात असताना कांदा, महागाई, बेरोजगारी, शेतमालाचे दर आदी मुद्यांभोवती निवडणूकीचा प्रचार फिरत आहेत. त्यामुळे मतांचा जोगावा मागायला जाणाऱ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांना जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. नाशिक व दिंडोरी मतदारसंघाची रणधुमाळीला सुरवात झाली असून, निवडणूकीत नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी ३ मे रोजी अंतिम मुदत आहे. नामनिर्देशन प्रक्रीयेस एकीकडे प्रारंभ झाला असताना ग्राउंड लेव्हलवर राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी प्रचाराची राळ ऊठवून दिली आहे. शहरी भागात प्रत्येक गल्लीबोळात प्रचाररॅली काढल्या जात आहे. ग्रामीणस्तरावर गावपातळीवर सभांचा धुराळा उडत आहेत. त्यामध्ये सत्ताधाऱ्यांकडून मागील ५ वर्षातील विकासाचा लेखाजोखा जनतेपुढे मांडत आहेत. रस्ते, रोजगार, विविध प्रकल्प अशा मुद्यांवर सत्ताधाऱ्यांची मदार आहे. तर विरोधक याच मुद्यांवरुन सत्ताधाऱ्यांवर पलटवार करत आहेत. मात्र, सत्ताधारी व विरोधकांच्या या लुटूपुटूच्या लढाईत यंदा जनतेने सुज्ञ भूमिका घेतली आहे.

प्रचारासाठी दारात येणाऱ्या सत्ताधाऱ्यांना मतदारांकडून ५ वर्षे कोठे होतात? असा प्रश्न केला जात आहे. महागाई, बेरोजगारी, कांदा निर्यातबंदीसारखा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्रीय पातळीवर तुम्ही काय पाऊले ऊचलली? पंचवार्षिकमध्ये जिल्ह्यात आणलेला एखादा मोठा प्रकल्प तरी सांगावा, अशी प्रश्नांची सरबत्तीच करण्यात येत आहे. दुसरीकडे विरोधकांनाही मतदार सोडत नसून पाच वर्षात कोणत्या कोपऱ्यात लपून बसला होतात. कांदा, बेरोजगारी, शेतमालाचे भाव, महागाई अशा प्रश्नांवर तुम्ही किती आंदोलन केली? निवडणूका आल्याने आता कुठे आमची आठवण आली का असा जाब जनतेमधून विचारला जात आहे. त्यामुळे ऐन एप्रिलमध्ये डोक्यावर सुर्य तळपत असताना जनतेच्या प्रश्नांमुळे सत्ताधाऱ्यांसह विरोधकांचा वांदा होत आहे.

निवडणूक साधी नाही..!

गेल्या पाच वर्षात राज्याच्या राजकारणात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. मनसेवगळता सर्वच प्रमुख पक्षांनी सत्तेची झुल अंगावर चढवली. मात्र, सत्तेचा सारीपाटात शुद्ध हरपून बसलेल्या पक्षांना लोकसभा निवडणूकीच्या दृष्टीने जनतेसमोर जावे लागत आहे. यादरम्यान, मतदारराजातील नाराजीचा सामना महायुती तसेच महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना करावा लागत आहे. त्यामुळे यंदा निवडणूक साधी नाही, याचा प्रत्यय यानिमित्ताने राजकीय पक्षांना येत आहे.

# निवडणूक प्रक्रियेतून भारताचे राष्ट्रीय प्रतीक राजचिन्ह बदलले !

## निवडणूक आयोगाचा अफलातून कारनामा; 'एम' नावाचे चिन्ह आणले उपयोगात

गोंदिया - भारतीय निवडणूक आयोगाच्या निवडणूक प्रक्रियेत याआधी भारताचे राष्ट्रीय प्रतीक असलेले ३ सिंहाच्या प्रतिमा दर्शवणारे राष्ट्रीय चिन्हाचा वापर केला जात होता. मात्र यावेळी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या प्रक्रियेतून चक्क सदर राजचिन्हाला निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेतून हद्दपार केले असून त्या जागी इंग्रजीत 'एम' शब्द लिहिले असलेल्या चिन्हाचा वापर करण्यात आले असल्याचा अफलातून कारनामा उघडकीस आला आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर अनेक शंकाकुशंका निर्माण होत आहेत. भारतात लोकसभा निवडणुकीला सुरुवात झालेली असुन प्रथम टप्पा १९ एप्रिल रोजी पार पडले असून निकाल ४ जून रोजी लागणार आहे. संपूर्ण लोकसभा निवडणूक यशस्वीरीत्या पार पडण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगाची असते. निवडणूक आयोगाची निर्मिती घटनात्मक असून ती स्वतंत्र यंत्रणा असते. भारत स्वतंत्र झाल्यापासून भारताचे राष्ट्रीय प्रतीक म्हणून सिंहाच्या प्रतिमा दर्शवणारी राजचिन्हाचा डिसेंबर १९४७ रोजी स्वीकार करण्यात आले. या राजचिन्हाचा उपयोग केंद्र शासन, अनेक राज्य सरकार तसेच शासकीय संस्थांद्वारे केला जातो. भारतीय निवडणूक आयोगाच्या वतीने निवडणूक प्रक्रिया पार पाडताना याआधी या चिन्हाचा वापर केला जात होता. निवडणूक आयोगाच्या वतीने निवडणूक पार पडल्यानंतर मतदान केंद्रांवरील साहित्य संकलित करून ते 'सिल' करण्यात येते.





'सिल' करतेवेळी जो शिक्का लावायचे त्यावर राष्ट्रीय चिन्हाचा वापर केला जात होता. वर्षांनुवर्षे हीच परंपरा कायम होती. मात्र प्रथम टप्प्यातील मतदान १९ एप्रिल रोजी पार पडले. यावेळी झालेल्या निवडणूक प्रक्रियेत साहित्य ' सिल ' करतेवेळी राजचिन्हाचा वापर थांबविण्यात आला असून त्याजागी इंग्रजीतील ' एम ' या शब्दाचा वापर करण्यात करण्यात आले असल्याचे निदर्शनास आलेले आहे. निवडणूक रिटर्निंग अधिकाऱ्याला देण्यात आलेल्या शिक्क्यावर राजचिन्ह ऐवजी इंग्रजीत 'एम' शब्द लिहिलेल्या चिन्हाचा वापर करण्यात आल्याने निवडणूक आयोगाने राज चिन्ह का बदलले असा प्रश्न निर्माण झालेला आहे. विशेष म्हणजे इंग्रजीतील 'एम ' शब्द कशाचे प्रतीक आहे? कुणाचे नाव आहे की आडनावाचे सूचक चिन्ह? असे एक ना अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. निवडणूक प्रक्रियेतून चक्क राष्ट्रीय चिन्हाचा वापर निवडणूक आयोगाने कुणालाही न सांगता कसे काय बदलले? त्यामुळे निवडणूक आयोगाच्या या अफलातून निर्णयावर अनेक शंकाकुशंका निर्माण होत असून यावर निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण देण्याची मागणी होत आहे.

# राज ठाकरेंच्या पहिल्या सभेची तारीख आणि ठिकाण ठरलं




मुंबई : लोकसभा निवडणुकीत आता मनसेप्रमुख राज ठाकरे यांची गर्जना होणार आहे. कारण महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिल्यानंतर राज ठाकरे आता महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेणार आहेत.

गेल्या काही दिवसांपासून राज ठाकरेंची सभा कधी आणि कुठे होणार याची अनेकांना उत्सुकता होता. अखेर राज ठाकरेंच्या पहिल्या सभेची तारीख आणि ठिकाण ठरलं आहे. राज ठाकरे यांची पाहिली सभा ४ मे रोजी कणकवलीमध्ये होणार आहे. महायुतीचे रत्नागिरी-सिंधुदुर्गातील उमेदवार नारायण राणे यांच्या प्रचारासाठी राज ठाकरे सभा घेणार आहेत.

राज ठाकरेंच्या पहिल्या सभेचं ठिकाण ठरलं

गुढीपाडवा मेळाव्यातून राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीसाठी मोदींच्या नेतृत्त्वाला पाठिंबा देत असल्याचे जाहीर केले होते. आपण फक्त मोदींमुळे भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीला पाठिंबा देत आहोत असे राज ठाकरेंनी जाहीर केले होते. त्यानंतर आता राज ठाकरे महायुतीच्या उमेदवरांचा प्रचार देखील करणार असल्याचे समोर आले आहे. याची सुरुवात कणकवलीतील सभेने होत आहे. कणकवलीतील उप रुग्णालयासमोरील मैदानात ४ मे रोजी राजगर्जना होणार आहे.

### राज ठाकरे काय बोलणार?

मनसेने रविवारी रत्नागिरी-सिंधुदुर्गमध्ये नारायण राणे यांच्या प्रचारासाठी सभा आयोजित केली होती. या सभेत उदय सामंत आणि नारायण राणे यांनी सभेसाठी राज ठाकरे अनुपस्थित असल्याची खंत बोलून दाखवली होती. त्यानंतर आता राज ठाकरेंची सभा होणार असल्याने या मतदारसंघातील मनसैनिकांमध्ये देखील उत्साह आहे. राज ठाकरेंच्या सभेमुळे राणेंची ताकद वाढणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे आता या सभेतून राज ठाकरे काय बोलणार याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.

# राज्यातील बेरोजगारीचे दर्शन

## पोलिस भरतीच्या १७,४७१ जागांसाठी १७.७६ लाख अर्जांचा ढीग

मुंबई : राज्यभरात १७ हजार ४७१ पदांची भरती होत आहे. त्यासाठी राज्यातील १७ लाख ७६ हजार बेरोजगार तरुणांनी अर्ज केले आहेत. त्यात अभियांत्रिकी झालेल्या तरुण- तरूणींसह डीटीएड, बीएड झालेल्यांसह बहुसंख्य उमेदवार पदवीधर असल्याची वस्तुस्थिती आहे.

राज्यातील बेरोजगारीचे दर्शन यापूर्वीच्या शासकीय विभागांच्या भरतीतून समोर आला आहे. जिल्हा परिषद, तलाठी भरतीत देखील जागांच्या तुलनेत दहापट अर्ज आले होते. आता पोलिस बॅण्डसमन या पदभरतीत एका जागेसाठी तब्बल ७८० उमेदवार रिंगणात आहेत. तुरुंग शिपाई या पदासाठी एका जागेकरिता २०६ तर पोलिस चालक पदासाठी एका जागेसाठी ११७ उमेदवार भरतीच्या मैदानात असणार आहेत. एकूणच या पोलिस भरतीत एका जागेसाठी १०२ उमेदवारांची परीक्षा होईल. मैदानी चाचणीत उत्तीर्ण झालेल्यांपैकी एका जागेसाठी दहा उमेदवारांची लेखी परीक्षेसाठी निवड होणार आहे.

लोकसभेची आचारसंहिता संपल्यानंतर म्हणजेच ४ जूननंतर मैदानी चाचणीला सुरवात होईल. उन्हाची तीव्रता पाहून सकाळच्या सत्रातच मैदानी चाचणी होणार आहेत. साधारणत: दिवाळीपूर्वी लेखी परीक्षा होवू शकते. पण, विधानसभेच्या आचारसंहितेत किंवा कामकाजामुळे या परीक्षेला अडचणी येणार नाहीत, यादृष्टीने गृह विभागाकडून नियोजन सुरू आहे.

लोकसभा निवडणूक व आचारसंहिता आणि पुन्हा सप्टेंबर-ऑक्टोबरमधील विधानसभा निवडणूक व आचारसंहिता, यावेळी बहुसंख्य पोलिस अधिकारी, कर्मचारी बंदोबस्तावर असतात. त्यामुळे भरतीसाठी मनुष्यबळ उपलब्धतेची अडचण येवू शकते. या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणूक सुरू होण्यापूर्वी गृह विभागाला सध्याची भरती उरकावी लागणार आहे अशी सद्य: स्थिती आहे.

पदे अन् उमेदवारांचे अर्ज

पदनाम रिक्त पदे अर्ज

पोलिस शिपाई ९,५९५ ८.२२ लाख

चालक १,६८६ १.९८ लाख

पोलिस बॅण्डसमन ४१ ३२,०००

एसआरपीएफ ४,३४९ ३.५० लाख

तुरुंग शिपाई १,८०० ३.७२ लाख

एकूण १७,४७१ १७.७६ लाख

लोकसभेच्या आचारसंहितेनंतर भरतीला प्रारंभ

पोलिस भरतीसाठी प्राप्त अर्जांची संख्या जास्त असल्याने शारीरिक चाचणीसाठी साधारणत: अडीच ते तीन महिने लागू शकतात.



उमेदवारांची मैदानी चाचणी झाल्यानंतर मुंबईसह राज्यभरातील सर्व उमेदवारांची एकाचवेळी लेखी परीक्षा घ्यायची की मुंबईची स्वतंत्र आणि इतर जिल्ह्यातील उमेदवारांची एकाचवेळी परीक्षा घ्यायची याचा निर्णय होणार आहे. मागील भरतीवेळी मुंबईची भरती स्वतंत्र झाली होती. यंदा तशाप्रकारेच घ्यायची की संपूर्ण राज्यभरातील उमेदवारांची एकाचवेळी लेखी परीक्षा घ्यायची याचा निर्णय आचारसंहितेनंतर होईल, अशी माहिती गृह विभागातील वरिष्ठ सूत्रांनी दिली.



# लग्न तिथीमुळे पारोळ्यात रस्त्यावर वाहतूक कोंडी

दक्ष जळगाव, प्रतिनिधी
वाल्मीक पाटील, पारोळा

शहरातून ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक ठप्प आहे यामुळे शहरातील रस्त्यांवर वाहतुकीच्या मोठ्या प्रमाणात खेडंबा होत आहे. वाहनांचा रांगा लागून इतरांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. या गंभीर प्रकाराकडे पोलिसांनी लक्ष देऊन कारवाई करावी अशी मागणी होत आहे. शहरातील राष्ट्रीय महामार्गावर क्र.६ वरील बस स्थानकापासून भडगाव व कजगाव चौफुलीवर आज आठवडे बाजार असल्याने तसेच लग्न तीथ मोठी असल्यामुळे वाहतुकीची मोठ्या प्रमाणावर कोंडी झाली होती.

या वाहतूक कोंडीला कारणीभूत असलेले रस्त्यावरील ठेलावड्या तसेच वाहन चालक त्यांची वाहने हे रस्त्याच्या खाली न थांबवता रस्त्यावर उभे करून प्रवासी बसवणे व उतरवतात. त्यामुळे वाहतुकीचा कोळंबा होऊन राहदारीला अडथळा निर्माण होत आहे. रोजची ही समस्या झाली असताना देखील या प्रकाराकडे वाहतूक पोलीस दुर्लक्ष करीत आहे. कजगाव रस्त्यावरील दुकानांसमोर उभे राहत असलेली वाहनांमुळे देखील वाहतुकीला अर्चना निर्माण होत आहे.

# बैलानेच मालकावर हल्ला करून जीवे ठार मारल्याच्या प्रकार घडला

दक्ष जळगाव, प्रतिनिधी
वाल्मीक पाटील, पारोळा



बैलाला पाणी पाजण्यासाठी सोडले असता बिचारलेल्या बैलानेच मालकावर हल्ला करून जीवे ठार मारल्याच्या प्रकार घडला आहे. पारोळा तालुक्यातील टिटवी प्रकाश तोताराम पाटील वय ५७ हे पशु मालक शनिवारी दुपारी साडेचार च्या सुमारास टिटवी शिवारातील शेतात आपल्या बैलांना पाणी पाजण्यासाठी सोडले असता यावेळी त्यातील एक बैल भितरून त्यांच्या अंगावर शिंगाने हल्ला केल्याने त्यांना हात पायास, छातीस व डोक्यास गंभीर दुखापत झाली. त्यांना पारोळा येथील कुटीर रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याबाबत देविदास पाटील यांच्या खबरीवरून पारोळा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पुढील तपास हवालदार सुधीर चौधरी हे तपास करीत आहे. दरम्यान बैलानेच मालकाच्या जीव घेतल्याने टिटवी गावासह तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# बालाजी विद्यालयाची हिंदवी पाटीलचे यश



दक्ष जळगाव, प्रतिनिधी
वाल्मीक पाटील, पारोळा

पारोळा येथील श्री बालाजी विद्या प्रबोधनी मंडळ संचालित प्राथमिक विद्यालयातील इ.३ रीची विद्यार्थिनी हिंदवी सुनील पाटील हिने ध्येय प्रकाशन अकॅडमी महाराष्ट्र आय.एम. विनर परीक्षेत इयत्ता तिसरीतून जळगाव जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळवून यश प्राप्त केले. हिंदवी चे संस्थापक अध्यक्ष यू. एच. करोडपती, संस्थेचे सचिव डॉ. सचिन बडगुजर, विद्यालयाचे मुख्याध्यापक हेमंतकुमार पाटील यांनी तिचे अभिनंदन व कौतुक केले. हिंदवी ही सुनील यशवंत पाटील (वि. का.सो. शेळावे ता. पारोळा) व सौ सुजाता सुनील पाटील (जि.प. शिक्षिका उऋड ता. पारोळा) यांची मुलगी आहे.

# कुऱ्हा पानाचे येथे बारागाड्या उत्साहात संपन्न



कुऱ्हे पानाचे : श्रीखंडेराव महाराज यात्रेनिमित्त येथे बारागाड्या उत्साहात पार पडल्या. भाविकांनी खंडेराव महाराज की जय, असा जयघोष केला. कुऱ्हे पानाचेसह महादेवमाळ, मांडवेदिगर, मुशाळतांडा, भिलमळी, मोंढाळे, वराडसिम, गोजोरे, सुनसगावसह परिसरातील ग्रामस्थांनी या यात्रोत्सवात उत्स्फूर्त सहभाग घेतला. यात्रेच्या दिवशी खंडेराव महाराजांच्या मंदिरासह गावातील विविध मंदिरांत विधिवत पूजा केली. ग्रामस्थांनी यात्रेत खरेदीचा मनमुराद आनंद घेतला. यात्रोत्सवासाठी परिसरातील भाविक दाखल झाले होते. भगत सुनील हिरालाल धनगर यांनी बारागाड्या ओढल्या. बगल्या संतोष धनगर व सुभाष पाटील यांनी साथ दिली. एक दशकानंतर यावर्षी सोपान कोळी दोनगावकर यांच्या लोकनाट्य मंडळाचे आयोजन केले होते. यात्रेत पाळणे, विविध प्रकारची खेळणी, खाद्यपदार्थ विक्रीची दुकाने थाटली होती. यात्रेत होणारी गर्दी पाहता कुठेही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

# बँकांनी शेतकऱ्यांना किसान क्रेडीट कार्ड द्यावे : जिल्हाधिकारी आयूष प्रसाद



जळगाव : जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे जीवनमान कसे उंचावेल, यासाठी कृषी विभागाने प्रयत्न करावेत. शेतजमिनीत रासायनिक खतांचा वापर टाळून जमिनीचे आरोग्य कसे टिकेल. शेतकऱ्यांच्या पिकांची उत्पादकता कशी वाढेल, यासाठी प्रयत्न करावेत.

जिल्हा बँक व राष्ट्रीय बँकांनी किसान क्रेडिट कार्डधारकांची प्राधान्याने संख्या वाढविण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त प्रयत्न करावेत.

बोगस बियाण्यांची विक्री होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी रविवारी (ता. २८) दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या खरीपपूर्व हंगाम बैठकीत अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अंकीत, विभागीय कृषी सहसंचालक मोहन वाघ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुरबान तडवी. प्रकल्प संचालक (आत्मा) रविशंकर चलवदे, कृषी विकास अधिकारी सूरज जगताप, कृषी उपसंचालक चंद्रकांत पाटील, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक प्रणवकुमार झा, नाबार्डचे व्यवस्थापक श्रीकांत झांबरे आदी उपस्थित होते.

खरीप हंगामासाठी प्रत्येक तालुकानिहाय पिकांचे सूक्ष्म नियोजन करावे. शेतजमीन तयार करण्यापासून ते बीज प्रक्रिया मोहिम राबविण्यापर्यंत, खतांचे नियोजन, खतांचा वापर कमी करून कंपोस्ट खते व इतर ग्रीन मॅन्युअरिंग,

अशा जैविक घटकांचा पावर करून व खर्च नियंत्रणात ठेवून कमीत कमी कीटकनाशकांचा वापर करावा. जमिनीचे आरोग्य टिकवून जास्तीत जास्त उत्पादकता कशी वाढेल, यावर भर द्यावा. शेतकऱ्यांचे राहणीमान कशाप्रकारे सुधारणा होईल, याकडे लक्ष द्यावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुर्बान तडवी यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे कृषी विभागाच्या विविध योजनांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाही व नियोजनाची माहिती दिली

# 'एमडीएच'चे मसाले सुरक्षित आहेत का?

## परदेशात बंदी घातल्यानंतर कंपनीने केला खुलासा

दिल्ली – 'एमडीएच' मसाले कंपनीच्या चार मसाला उत्पादनांमध्ये इथिलीन ऑक्साईडचे मर्यादेपेक्षा जास्त अंश आढळल्यामुळे हाँगकाँग आणि सिंगापूरने या मसाल्यावर बंदी घातली आहे. हाँगकाँगमधील सेंट्रल फूड सेफ्टी प्राधिकरणाने हे मसाले खरेदी न करण्याचे आवाहन ग्राहकांना केले आहे. तसेच सिंगापूरमधील हे मसाले बाजारातून काढून घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. यानंतर या मसाल्यांवरील बंदीबाबत भारतीय मसाले बोर्डानेही लक्ष घातले आहे. यानंतर आता यावर 'एमडीएच' मसाले कंपनीकडून या संदर्भात स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

'एमडीएच'ने काय सांगितले?

भारतीय मसाला निर्माता एमडीएच कंपनीने सांगितले की, एमडीएचचे उत्पादने वापरासाठी सुरक्षित आहेत. तसेच कंपनीला अद्याप त्यांच्या उत्पादनांमध्ये कथित दूषिततेबद्दल हाँगकाँग किंवा सिंगापूरमधील अन्न सुरक्षा नियामक प्राधिकरणाकडून कोणताही संवाद प्राप्त झालेला नाही. एमडीएचने रविवारी एका निवेदनात म्हटले, आम्ही आमच्या खरेदीदारांना आणि ग्राहकांना खात्री देतो, आम्ही आमच्या मसाल्यांच्या साठवणीच्या प्रक्रिया आणि पॅकिंग प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर इथिलीन ऑक्साईडचा वापर करत नाही, असे कंपनीने म्हटले. या संदर्भातील वृत्त रॉयटर्सने दिले आहे.

दरम्यान, 'एमडीएच' आणि एव्हरेस्टचे मसाले भारतात आणि परदेशातही सर्वाधिक लोकप्रिय मसाले आहेत. हे मसाले युरोप, आशिया आणि अमेरिकेतही विकले जातात. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, आता या मसाल्यावर हाँगकाँग आणि सिंगापूरने बंदी घातल्यानंतर यूएस अन्न आणि औषध प्रशासन एमडीएच आणि एव्हरेस्टच्या उत्पादनांची माहिती गोळा करण्याचे काम सुरु केले आहे.

भारत सरकारने काय भूमिका घेतली?

माहितीनुसार, भारतीय मसाला निर्माता एमडीएच कंपनीच्या मसाल्यावर हाँगकाँग आणि सिंगापूरने बंदी घातल्यानंतर भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (ऋडड-ख) गुणवत्ता मानके तपासणार असल्याची माहिती आहे. तसेच भारताच्या मसाले मंडळाने हाँगकाँग आणि सिंगापूरमधील अधिकाऱ्यांकडून एमडीएचच्या आणि एव्हरेस्टच्या निर्यातीचा डेटा मागवला असून या मसाल्याची गुणवत्ता तपासण्यात येणार आहे.

# शेतीतूनच समृद्धी आणि प्रतिष्ठा मिळेल – अनिल जैन

## जैन हिल्स येथे फालीच्या १० व्या संम्मेलनाचा समारोप

दक्ष जळगाव, शहरप्रतिनिधी
महेश माळी, जळगांव

जळगाव दि.२९ : शेतीत नावीण्यपूर्ण प्रयोग करून शेतीतून समृद्धी आणि प्रतिष्ठा मिळवू शकता. २०४७ पर्यंत भारत विकसीत देश बनेल व त्यासाठी कृषी क्षेत्र अत्यंत मोलाची भूमिका बजावेल.' भारतीय शेती व कृषी-उद्योगाचे भविष्य बदलणाऱ्या 'फ्युचर ग्रिकल्चर लीडर्स ऑफ इंडिया' (ऋ-ड्ख) ह्या उपक्रमांतर्गत तिसऱ्या टप्प्यातील समारोपाच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात फालीचे चेअरमन तथा जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष अनिल जैन यांनी प्रतिपादन केले. यावेळी व्यासपीठावर फालीच्या उपाध्यक्षा नॅन्सी बॅरी, ज्या कंपन्यांनी या कार्यक्रमास सहयोग दिला त्या कंपनीचे प्रतिनिधी अजय तुरकने, सुचेत माळी(रॅलीज इंडिया), डॉ. शविंदर कुमार (महेंद्रा), मयूर राजवाडे, अजिंक्य तांदळे (यूपीएल), जयंत चॅटर्जी, प्रवीण कासट आणि राजकुमार (स्टार ॲग्री), डॉ. समीर मुरली, गौतम पात्रो (गोदरेज ॲग्रोव्हेट), डॉ. दिलीप चौधरी (अमूल) आणि जैन इरिगेशनचे डॉ. बी.के. यादव, डॉ. प्रकाश पंचभाई यांची उपस्थिती होती. फालीच्या विद्यार्थ्यांसमवेत संवाद साधताना अनिल जैन म्हणाले की, शेती क्षेत्रात खूप मूल्यवर्धन करण्याची संधी आहे. शेतीतून सर्वांना अन्न-धान्य प्राप्त होते परंतु सौंदर्य प्रसादने जरी बनवायचे असतील तरी त्यासाठी फळे, फुले लागत असतात. शेतीमध्ये प्रामाणिक कार्य केले तर तुमची प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही असा आत्मविश्वास निर्माण करत भविष्यात तुम्हाला शेती संदर्भात काही मार्गदर्शन लागले तर जैन इरिगेशनचे तज्ज्ञ सहकार्य करतील. फालीच्या




माध्यमातून तुम्ही शेतीमध्ये काम कराल ही सकारात्मक गोष्ट असल्याचे ते म्हणाले. यावेळी फालीच्या उपाध्यक्षा नॅन्सी बॅरी यांनी सुसंवाद साधला. त्यांनी दहा वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला. त्याच्या भाषणाचा अनुवाद फालीच्या मॅनेजर रोहिणी घाडगे यांनी केला. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन हर्ष नौटियाल यांनी केले.

बिझनेस प्लॅन प्रेझेंटेशन विजेते

ग्रीकल्चरल वेस्ट इको फ्रेंडली बेस्ट, शारदा पवार विद्यानिकेतन शारदानगर, पुणे (प्रथम), डीओसी ट्रेझर-जनता गर्ल हायस्कूल शेंदुरजन घाट जि. अमरावती (द्वितीय), काऊ डंग प्रोडक्ट- सोमेश्वर विद्यालय मुढाळे जि. पुणे (तृतीय), पर्पल सेलिब्रेशन- श्री विठ्ठल माध्यमिक अँड ज्युनियर कॉलेज भिकोबानगर जि. पुणे (चौथा), व्हेजिटेबल डीहायड्रेशन (नूतन माध्यमिक विद्यालय किनगावराजा जि. बुलढाणा (पाचवा) असे विजेते ठरले व त्यांचा गौरव मान्यवरांच्याहस्ते करण्यात आला.

नाविन्यपूर्ण इनोव्हेशन विजेते

सेफ्टी स्टिक – महात्मा गांधी विद्यालय आष्टा जि. सांगली (प्रथम), स्मार्ट ग्री स्प्रेअर- दानोली हायस्कूल दानोली जि. कोल्हापूर (द्वितीय), स्टार्टर चेंबर फॉर बिगिनर्स अँड ऑफ सिझन क्रॉप्स- जयश्री पेरिवाल इंटरनॅशनल हायस्कूल जयपूर (राजस्थान) (तृतीय), एआय बेस्ड सोलार इन्सेक्ट ट्रॅप ण्ड फार्म प्रॉटेक्शन सिस्टीम फॉर निमल- महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय देऊळगावमाळी जि. बुलढाणा (चौथा), रेन पाईप (एचडीपीई) रॅपर- आदिवासी विकास हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज खजरी जि. गोंदिया (पाचवा) असे विजेते ठरले.

संवाद, पत्रकार परिषद

शालेय जीवनापासूनच शेती करणे कसे फायद्याचा, उत्तम व्यवसाय आहे हे समजावून देणे प्रत्यक्ष अनुभव देण्याचे काम फलीला माध्यमातून केले जात आहे. गेल्या दहा वर्षांपासून केले जात आहे. या दहा वर्षात चाळीस हजार विद्यार्थ्यां पर्यंत फालीचे काम पोहोचले आहे. या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेशातील १७५ शाळांच्या सुमारे १२०० विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. भविष्यात २०३२ पर्यंत २५ लाख विद्यार्थ्यांचा समावेश असणार आहे अशी माहिती फालीचे चेअरमन तथा जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष अनिल जैन यांनी दिली. फालीच्या उपाध्यक्षा नॅन्सी बॅरी यांनी देखील पत्रकारांशी संवाद साधला. फालीचे माजी विद्यार्थ्यांनी फालीमुळे आपली प्रगती कशी झाली याबाबत अनुभव कथन केले. रोहिणी घाडगे यांनी व्यासपीठावरील मान्यवरांचा परिचय करून दिला. पत्रकार परिषदेचे संचालन व आभार प्रदर्शन जैन इरिगेशनचे मीडिया व्हाईस प्रेसिडेंट अनिल जोशी यांनी केले.

# बत्ती गुल झाल्यास 'एआय' करणार मदत; 'महावितरण'ची अनोखी शक्कल

जळगाव – 'वेलकम टू महावितरण, आय म ऊर्जा. हाऊ कॅन आय हेल्प यू टुडे'. तक्रार करण्यापूर्वीच महावितरणकडून तुम्हाला असा संदेश मिळाल्यास आश्चर्य वाटू देऊ नका. कारण महावितरणने आपल्या ग्राहकांकरिता तक्रार व इतर अडचणी ऐकून घेण्यासाठी 'एआय' तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. त्यामुळेच रात्री-अपरात्री वीजपुरवठा खंडित झाल्यास तातडीने तक्रार नोंदविता येणार आहे. ही सुविधा महावितरणाने सुरू केली असल्याने ग्राहकांना तातडीने तक्रार नोंदविता येणार आहे.

### ऊर्जा चॅट बॉट

विजेच्या संदर्भात ग्राहकांना अनेकदा महावितरणबाबत अडचणी येत असतात. प्रत्येक वेळी कार्यालयात जाऊन अडचणीचे निराकरण करणे शक्य होत नाही. रात्री-अपरात्री अधिकाऱ्यांना प्रश्न विचारणेही योग्य ठरत नाही. अशावेळी कुणाला तरी प्रश्न विचारून उत्तर मिळाल्यास बरे होते. वीज ग्राहकांची ही अडचण लक्षात घेऊन महावितरणने 'ऊर्जा, चॅट बॉट' ही एआय तंत्रज्ञानावर आधारित सेवा सुरू केली आहे.

### येथे साधता येणार संवाद

वीज ग्राहकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी महावितरणने एआय तंत्रज्ञानाची 'चॅट बॉट' सेवा www.mahadiscom.in या वेबसाईटवर उपलब्ध करून दिली आहे. लवकरच ती मोबाईल फोन अप्लिकेशनवरहील उपलब्ध होणार आहे.

### कोणत्या तक्रारींचे होऊ शकते समाधान

विजेसंदर्भात तक्रार नोंदणी, घरगुती, व्यावसायिक, कृषी आणि औद्योगिक वीज जोडणीची मागणी, नवीन वीज जोडणीच्या सध्याच्या अर्जाची स्थिती, वीजबिल कॅल्क्युलेटर, ग्रो गीन नोंदणी आणि ऑनलाइन पेमेंटची माहिती आदी सेवांचा लाभ यात घेता येणार आहे.

# बारावीचा निकाल २५ मेच्या आधी तर दहावीचा निकाल ६ जून पूर्वी लागण्याची शक्यता

जळगाव – १०वी आणि १२वी परीक्षेच्या निकालाची विद्यार्थी वाट पाहत असून अशातच अत्यंत महत्वाची बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासण्याचे काम जवळपास पूर्ण झालं असून बारावीचा निकाल २५ मेच्या आधी तर दहावीचा निकाल ६ जून पूर्वी लागण्याची शक्यता आहे.

त्यादृष्टीने राज्य मंडळ जलदगतीने तयारी करीत असल्याची माहिती राज्य मंडळातील वरिष्ठ अधिकार्यांनी दिली आहे. यंदा महाराष्ट्रात दहावीची परीक्षा १ ते २६ मार्च आणि बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १९ मार्च यादरम्यान घेण्यात आली.

एकूण ३ हजार ३२० परीक्षा केंद्रांवर बारावीच्या तर, ५ हजार ८६ केंद्रावर दहावीची परीक्षा घेण्यात आल्या होत्या.यासाठी महामंडळाने जोरदार तयारी करत अनेक ठिकाणी कॉफीमुक्त केंद्र पाहायला मिळाले होते. दरम्यान, दहावी आणि बारावीचा निकाल लवकर लागण्याच्या दृष्टीने जलदगतीने तयारीला सुरुवात झाली आहे. उत्तरपत्रिका तपासण्याचे काम काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्यामुळे बारावीचा निकाल २५ मेच्या आधी तर दहावीचा निकाल ६ जून पूर्वी लागण्याची शक्यता आहे.

दहावी-बारावीचा निकाल कुठे चेक कराल?

विद्यार्थी दहावी आणि बारावीचा निकाल पाहण्यासाठी दरवर्षी बोर्डाकडून अधिकृत वेबसाईट जारी करण्यात येते. विद्यार्थी mahahsscboard.in आणि Iahresult.nic.in या साईटवर जाऊन निकाल बघू शकतात. निकाल बघण्यासाठी विद्यार्थ्यांकडे त्यांचा परीक्षा क्रमांक असणे आवश्यक आहे.

# १ मे पासून दुध खरेदी दरात वाढ

जळगाव – शेतमालाचे पडलेले भाव आणि जिल्हा दूध उत्पादक संघाकडून दूधाच्या दरकपातीचा मुद्दा लोकसभा निवडणुकीत ऐरणीवर आलेला आहे. महाविकास आघाडीच्या सभेत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी जिल्हा दूध संघाकडून शेतकऱ्यांना दूधाचे कमी दर दिले जात असल्याचा व शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणारे पाच रुपयांचे अनुदान ८ ते १० टक्केच शेतकऱ्यांना मिळाले असल्याचा आरोप केला होता. विरोधकांकडून हा प्रचाराचा मुद्दा करण्यात आला. म्हणून आता दूध संघाने गायीच्या दूध खरेदी दरात २.४० पैसे तर म्हशीच्या दूध खरेदी दरात २ रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही दरवाढ १ मे पासून लागू होणार आहे.

शहरात २४ एप्रिलला मविआची सभा झाली. या सभेत जयंत पाटील यांनी जळगाव जिल्हा दूध संघ भाजपच्या ताब्यात आहे. दुधाला किंमत २७ रुपये लिटर आहे. एवढ्या कमी दरात दूध खरेदी करतात. आमच्या भागात सांगलीला हा दर ३४ रुपये आहे. दूध उत्पादकांना पाच रुपयांचे अनुदान या जिल्ह्यात आले. आठ ते दहा टक्के शेतकऱ्यांना मिळाले. ९० टक्के शेतकऱ्यांना मिळाले नाही. ते पैसे यांनी खावून टाकलेत असा आरोप केला होता. दूध संघ दूध उत्पादकांना कमी दर देत असल्याच्या मुद्यावर त्यांनी बोट ठेवले होते. त्यानंतर हा मुद्दा लोकसभा निवडणुकीत प्रचाराचा बनला आहे. जिल्ह्यातील मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील व मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील व आमदार मंगेश चव्हाण हे दूध संघाचे संचालक असतानाही कमी दर मिळत असल्याने नाराजी होती. या पार्श्वभूमीवर २७ एप्रिल रोजी दूध संघाच्या संचालकांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार गायीच्या दूध खरेदी दरात २ रुपये ४० पैशांची वाढ करण्यात आली असून ३.५/८.५ फॅटसाठी २९ रुपये ४० पैसे असा दर राहणार आहे. म्हैस दूध खरेदी दरात २ रुपयांची वाढ होणार असून ६/९ फॅटला ४६ रुपये ४० पैसे लिटर असा दर राहील.




# पारोळ्याजवळ डंपरने कुटुंबाला चिरडले आई व मुलगा जागीच; ठार पत्नी गंभीर

दक्ष जळगाव, प्रतिनिधी
वाल्मीक पाटील, पारोळा

पारोळा तालुक्यातील सार्वे गावाजवळ झालेला झालेला रस्ते अपघात आई व मुलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पुनम प्रतीक पाटील (२४) व अगस्य प्रतीक पाटील(१) असे महेत झालेल्या आई व मुलाचे नाव आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे कि शहादा येथील रहिवासी प्रतीक सुनील पाटील हे आपल्या मित्राच्या लग्नासाठी चिखलोडहुन एरंडोल कडे जात असताना सर्वे गावाजवळ त्यांची मोटरसायकल स्लीप झाली त्यामुळे त्यांच्यासोबत असलेले त्यांची पत्नी व त्यांचा मुलगा देखील खाली पडले. मात्र याच वेळी मागून येणाऱ्या डंपरणे पूनम प्रतीक पाटील(२४) व अगस्य प्रतीक पाटील (१) यांना चिरडले. यादरम्यान दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर या अपघातात प्रतीक सुनील पाटील(३०) यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने ते जखमी जाण्याची माहिती मिळाली आहे. पारोळ्याजवळ डंपरने कुटुंबाला चिरडले;आई व मुलगा जागीच; ठार पत्नी गंभीर. पारोळा प्रतिनिधी;वाल्मिक पाटील पारोळा तालुक्यातील सार्वे गावाजवळ झालेला झालेला रस्ते अपघात आई व



मुलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पुनम प्रतीक पाटील (२४) व अगस्य प्रतीक पाटील(१) असे महेत झालेल्या आई व मुलाचे नाव आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे कि शहादा येथील रहिवासी प्रतीक सुनील पाटील हे आपल्या मित्राच्या लग्नासाठी चिखलोडहुन एरंडोल कडे जात असताना सर्वे गावाजवळ त्यांची मोटरसायकल स्लीप झाली त्यामुळे त्यांच्यासोबत असलेले त्यांची पत्नी व त्यांचा मुलगा देखील खाली पडले. मात्र याच वेळी मागून येणाऱ्या डंपरणे पूनम प्रतीक पाटील(२४) व अगस्य प्रतीक पाटील (१) यांना चिरडले. यादरम्यान दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर या अपघातात प्रतीक सुनील पाटील(३०) यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने ते जखमी जाण्याची माहिती मिळाली आहे.

# साकेगाव येथील बालकाचे अपहरण प्रकरणी पाच संशयीतांना अटक ?

दक्ष जळगाव, शहर प्रतिनिधी
सागर पाटील, जळगांव

भुसावळ - तालुक्यातील साकेगाव येथील अवघ्या आठ महिन्याच्या बालकाचे अज्ञाताकडून अपहरण करण्यात आले होते या घटनेचा तपास पोलीस करीत होते शेवटी पोलीसांना बाळ व अपहरण कर्ते शोधण्यात यश आल्याने पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक केले जात आहे.
दि.२३ एप्रिल २४ रोजी मध्यरात्री दीड ते दोन वाजेच्या सुमारास झोक्यात झोपलेल्या अरविंद अर्जुन भील या बालकाचे साकेगाव येथून अपहरण करण्यात आले होते या बाबत भुसावळ तालुका पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांना माहिती मिळताच भुसावळ येथील नारायण नगर, मोरया हॉल च्या मागे शिवपूर कन्हाळा रोड येथील



अलका जीवन स्पर्श फाऊंडेशन या संस्थेच्या ठिकाणी छापा टाकण्यात आला अपहरण करण्यात आलेले बालक या ठिकाणी सापडले असून या बालकाचा साकेगाव येथील त्याच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. या प्रकरणी दिपक रमेश परदेशी नारायण नगर भुसावळ, अमित नारायण परिहार नागसेन कॉलनी कंडारी भुसावळ, कुणाल बाळू वाघ शिंगारबर्डी साकेगाव, बाळू पांडुरंग इंगळे ऑर्डनन्स फॅक्टरी वरणगाव आणि रिना राजेंद्र कदम नारायण नगर भुसावळ अशा पाच जणांना अटक करण्यात आली आहे .आणखी एक आरोपी फरार असून दोन अल्पवयीन बालकांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे. यातील अटक करण्यात आलेल्या आरोपी विरुद्ध अनेक प्रकारचे गुन्हे असून एक आरोपी नंदुरबार जिल्हा येथे पोलीस असल्याची माहिती आहे.

जळगाव जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ महेश्वर रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते यांच्या मार्गदर्शनाखाली भुसावळ विभागाचे पोलीस उपअधीक्षक कृष्णांत पिंगळे, भुसावळ तालुका पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक बबनराव जगताप, एपीआय विशाल पाटील, सफौ विठ्ठल फुसे, पोहेकॉ युनूस शेख, प्रेमचंद सपकाळे, दिपक जाधव, वाल्मिक सोनवणे, उमेश बारी, राईटर संजय तायडे, राहुल महाजन, सफौ सादिक शेख, दिलीप जाधव, संजय भोई, जगदीश भोई, महिला पोलीस छाया पाटील, पोना नितीन चौधरी, उमाकांत पाटील, रमण सुरळकर, योगेश माळी, प्रशांत परदेशी, राहुल भोई , अमर आढाळे व पोऊनि वाघमारे यांनी या पथकात सहभागी होऊन एका बालकाची भेट घडवून आणली आहे. या कामगीरी मुळे भुसावळ तालुका व बाजार पेठ पोलीसांचे कौतुक केले जात आहे.

# नवजात बालकांची विक्री करणारी आंतरराज्यीय टोळीला अटक

मुंबई - नवजात बालकांची विक्री करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील डॉक्टरसह सात एजंटना गुन्हे शाखा कक्ष २ पोलिसांनी अटक करुन २ बालकांची सुटका केली आहे. वंदना पवार, शितल वारे, स्नेहा सुर्यवंशी, नसीमा खान, लता सुरवाडे, शरद देवर, डॉ. संजय खंदारे अशी अटक करण्यात आलेल्या सात जणांची नावे आहेत.
कन्नमवार नगर परिसर, विक्रोळी (पूर्व) येथून एका ५ महिन्याच्या बाळाला शितल वारे हिने विक्री केली आहे अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुषंगाने पोलिसांनी शितल वारेचा शोध घेऊन तिला गोवंडी परिसरातून अटक केली आणि तिच्याकडे केलेल्या चौकशीत तिने ५ महिन्याच्या बाळाची



विक्री डॉ. संजय सोपानराव खंदारे (बी.एच.एम.एस) व वंदना पवार यांच्यामार्फत संजय पवार आणि सविता पवार यांना २,००,०००/- रुपयांमध्ये विक्री केली असल्याचे सांगितले. त्याआधारे पोलिसांनी डॉ. संजय खंदारे व वंदना यांना ताब्यात घेऊन विक्री केलेल्या ५ महिन्याच्या बाळाची गुहागर, रत्नागिरी येथून संजय पवार आणि सविता पवार यांच्या ताब्यातून सुटका केली.
तसेच शितल वारे हिने तिचे एजंट साथीदार शरद देवर व स्नेहा सुर्यवंशी यांच्या मदतीने २ वर्षाची मुलगी २,५०,०००/- रुपयांमध्ये विक्री केल्याची आणखी माहिती समोर आल्याने सदर विक्री केलेल्या २ वर्षाच्या मुलीची सुटका देखील पोलिसांनी केली आहे.
दरम्यान, या टोळीने दलाल, साथीदारांमार्फत नवजात बालकांची तेलंगणा, आंध्र प्रदेश व महाराष्ट्र अशा वेगवेगळ्या जिल्हयात व राज्यात लहान मुलांची विक्री केली असल्याची माहिती समोर आली आहे.

# मनी लॉन्ड्रींगची केस असल्याचे सांगत तरुणाची नऊ लाखांची फसवणूक

पुणे - तुमच्या विरोधात मनी लॉन्ड्रींगची केस असल्याचे सांगत तरुणाकडून ९ लाख १६ हजार २५६ रुपये घेत फसवणूक करण्यात आली. ही घटना ऑनलाईन माध्यमातून मगरपट्टा सिटी येथे घडली.
याप्रकरणी १९ वर्षीय तरुणाने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अनोळखी व्यक्तींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनोळखी व्यक्तींनी फिर्यादी तरुणाला संपर्क केला. तुमच्या विरोधात मनी लॉन्ड्रींगची केस आहे, असे सांगून त्याबाबत चौकशी सुरु असल्याचे सांगितले. त्यानंतर चौकशीच्या बहाण्याने तरुणाकडून ९ लाख १६ हजार २५६ रुपये घेत आर्थिक फसवणूक केली. हडपसर पोलीस तपास करीत आहेत.

## - निधन वार्ता -

### राजाराम विश्राम पाटील



जळगांव : येथील श्री.राजाराम विश्राम पाटील (८०) यांचे दि. २९/०४/२४ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुली, मुले, नातवंडे असा परिवार आहे. ते अविनाश राजाराम पाटील व अॅड. वासुदेव राजाराम पाटील यांचे वडील होत.

# ज्येष्ठ नेते शरद पवार शुक्रवारी जळगावला मुक्कामी थांबणार

## नाराजांशी चर्चेसह व्यूहरचनेवर भर

दक्ष जळगाव, शहर प्रतिनिधी
सागर पाटील, जळगांव

जळगाव : राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार येत्या शुक्रवारी (ता. ३) जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, ते येथे मुक्कामी थांबणार आहेत. नाराजांशी चर्चेसह निवडणुकीच्या रणनीतीविषयी ते पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून निवडणुकीचा आढावा घेणार आहेत. त्यामुळे या दौऱ्याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.
श्री. पवार आपल्या पक्षाच्या तसेच महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी राज्यभर सभा घेत आहेत. काही ठिकाणी मुक्काम करून ते आपल्या पक्षाच्या तसेच महाविकास आघाडीच्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी काही रणनीतीही आखून देत आहेत. परिसरातील काही लोकांच्या भेटीगाठी घेऊन चर्चाही करीत आहेत.



शुक्रवारी (ता. ३) रावेर मतदारसंघातील उमेदवार श्रीराम पाटील यांच्या प्रचारार्थ ते सभा घेणार आहेत. हेलिकॉप्टरने जळगाव विमानतळावर ते सकाळी दहाला येतील. अकरा ते दुपारी एकपर्यंत चोपडा येथे जाहीर सभा, साडेतीन ते साडेचारपर्यंत भुसावळ येथे सभा, तर सायंकाळी सात ते रात्री आठपर्यंत मुक्ताईनगर येथे जाहीर सभा घेणार आहेत.
मान्यवरांशी भेटी अन चर्चा
मुक्ताईनगरातील सभा आटोपल्यावर शरद पवार जळगाव येथे रात्री मुक्कामी असणार आहेत. या वेळी ते काहींच्या भेटीही घेणार असल्याचे सांगण्यात येते. काही जणांशी चर्चा करणार आहेत. जळगाव लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीतर्फे शिवसेना ठाकरे गटाचे करण पवार उमेदवार आहेत.
रावेर लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) श्रीराम पाटील उमेदवार आहेत. त्यामुळे या दोन्ही उमेदवारांच्या यशासाठी शरद पवार काय रणनीती ठरवितात, याकडे लक्ष असेल.

# जामन्या-गाडऱ्या आदिवासी पाड्यांवरील अवैद्य दारू विक्री बंदीबाबत ग्रामसभा ठरावातुन पोलिसांकडे मागणी

दक्ष जळगाव, प्रतिनिधी
जुम्मा तडवी, रावेर

यावल तालुक्यातील सातपुडा पर्वताच्या अतिदुर्गम क्षेत्रातील आदिवासी पाड्यांवर मोठ्या प्रमाणावर अवैद्य गावठी दारूची सर्रासपणे विक्री होत असुन सदरील खुलेआम विक्रीस दारूमुळे अनेक अल्पवयीन मुले दारू आर्कषणास बळी पडून व्यसनाच्या आहारी जावुन त्यांचे आयुष्य उद्धवस्त होवुन मृत्युमुखी पडत असल्याचा धक्कादायक प्रकार घडत आहे. पोलीस प्रशासन व उत्पादन शुल्क विभागाने याकडे तात्काळ लक्ष वेधुन संयुक्तपणे कार्यवाही करावी व अवैद्य दारूची होणारी विक्री कायमची बंद करावी अशी मागणी पद्य वस्त्यांवरील आदिवासी बांधवांकडून केली जात आहे.
या संदर्भात सातपुडा पर्वताच्या



अतीदुर्गम क्षेत्रातील गाडऱ्या जामन्या,उसमळी,लंगडा आंबा या मध्यप्रदेश राज्याच्या सिमेवर लागुन असलेल्या गावपाड्यांवर गेल्या अनेक दिवसांपासुन सर्रासपणे विविध प्रकारची रसायनीक व हातभट्टीची गावठी दारूची मोठया प्रमाणावर सर्वत्र खुलेआम विक्री करण्यात येत असल्याने अनेक तरूण व अल्पवयीन मुल हे दारूच्या आहारी जावुन व्यसनाधीन होवून त्यांचे व त्यांच्या कुटुंबीयांचे आयुष्य उध्दवस्त होत आहे.याबाबत महिला वर्गाकडून सतत होणाऱ्या दारूबंदीच्या मागणीला गाडऱ्या जामन्या या ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच मोती जुगा बारेला यांनी महिलांच्या दारूबंदी संदर्भातील मागणीची दखल घेत गाडऱ्या जामन्या,उसमळी,लंगडा
आंबा या गावातुन अवैद्य मार्गाने विक्रीस जाणाऱ्या दारूची विक्री बंद करावी असा ठराव ग्रामपंचायतव्दारे घेण्यात आलेल्या ग्रामसभेत घेतला असुन या संदर्भातील संबधीत दारू विक्रत्यांवर कार्यवाही करण्यात यावी असे पत्र यावलचे पोलीस निरिक्षक यांना देण्यात आले आहे.या निवेदनावर मोठया प्रमाणावर गाडऱ्या जामन्या ग्रामस्थांच्या स्वाक्षरी आहे.दरम्यान पोलीसांनी वाघझीरा या ठिकाणी केलेल्या दारूबंदीच्या कार्यवाहीचे स्वागत करण्यात येत असुन तरी देखील यावल तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींच्या वतीने ग्रामसभेत ठराव करून सदरच्या अवैधरित्या विक्रीस जाणाऱ्या दारू बंद करावी अशी मागणी करण्यात आलेली आहे. पोलीस प्रशासनाने व उत्पादन शुल्क विभागाने या कार्यवाही देखील लक्ष देऊन या पाड्या वस्त्यांवरील अवैद्य गावठी दारू कायमची बंद करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

# डॉ. हिना गावित यांनी घेतली शिवसेना नेते चंद्रकांत रघुवंशी यांची भेट; रघुवंशी यांनी दिल्या आशीर्वादपर शुभेच्छा

दक्ष जळगाव, प्रतिनिधी
सुरेश बोरसे, नंदुरबार

नंदुरबार - महायुतीच्या तथा भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार डॉक्टर हिना गावित यांनी प्रचाराचा शुभारंभ करून झाल्यावर रॅलीने




जात असतानाच एकनाथराव शिंदे गटाच्या शिवसेनेचे नेते माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेतली आणि आशीर्वाद घेतले. नंदुरबारच्या राजकीय पार्श्वभूमीवर ही घटना शहरवासीयांना धक्का देणारी ठरली आणि त्यामुळेच रघुवंशी व गावित यांची भेट शहरवासीयांच्या चर्चेची सुद्धा बनली.
अधिक वृत्त असे की, श्री गणेशाच्या चरणी नारळ वाढवून नंदुरबार शहरात प्रचाराला शुभारंभ केल्यानंतर महायुतीच्या उमेदवार खासदार डॉक्टर हिनाताई गावित यांनी आज दिनांक २७ एप्रिल २०२४ रोजी सकाळी माननीय एकनाथराव शिंदे गटाच्या शिवसेना कार्यालयात जाऊन शिवसेनेचे संपर्क नेते तथा माजी आमदार माननीय श्री चंद्रकांत जी रघुवंशी यांची भेट घेतली तसेच आशीर्वादही घेतले. माननीय चंद्रकांत जी रघुवंशी यांनी याप्रसंगी पुष्पगुच्छ देऊन डॉक्टर हिनाताई गावित यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. एकनाथराव शिंदे गटाच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख श्री राम रघुवंशी, भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष निलेश माळी, भाजपाचे युवा नेते डॉक्टर विक्रांत मोरे, आनंदा माळी, माजी गटनेते चारुदत्त कळवणकर, शिंदे गटाच्या शिवसेनेचे माजी नगराध्यक्ष कुणाल वसावे, माजी उपनगराध्यक्ष परवेज खान, रवींद्र पवार आदी उपस्थित होते. एकनाथराव शिंदे गटाची शिवसेना महायुतीचा घटक पक्ष असतानाही लोकसभा निवडणूक प्रचारात सहभागी झालेला दिसत नव्हता त्या पार्श्वभूमीवर डॉक्टर हिनाताई गावित यांनी चंद्रकांत रघुवंशी यांची घेतलेली ही भेट चर्चेचा मोठा विषय बनली. दरम्यान डॉक्टर हिनाताई गावित यांनी शहीद स्मारक सारख्या महत्त्वाच्या ठिकाणी थांबून अभिवादन केले. ज्येष्ठ नेते काकासाहेब हिरालाल चौधरी आणि तत्सम मान्यवरांच्या घरी भेट दिली. माजी नगराध्यक्षा इंदू काकू चौधरी, माजी नगरसेविका सौ अनिता चौधरी यांनी औक्षण करून त्यांना आशीर्वाद दिले.

# दोन ट्रक पकडून २५ गायींना जीवदान



भुसावळ - पंजाबमधून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कत्तलीच्या उद्देशाने जाणाऱ्या गाईंनी भरलेले दोन ट्रक भुसावळ व यावल येथील गोप्रेमींच्या सतर्कतेमुळे पकडले. ही कारवाई सोमवारी दुपारी घडली. दोन ट्रकमध्ये कोंबून भरलेल्या २५ गायींना जीवदान देण्यात आले. दोन गायींसह एका वासराचा मृत्यू झाला. याप्रकरणी रात्री उशिरा पंजाब राज्यातील चालकांविरोधात भुसावळ शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.
पंजाब राज्यातून गायींची अत्यंत निर्दयतेने दोन ट्रकमधून कत्तलीच्या उद्देशाने वाहतूक होत असल्याची माहिती यावल तालुक्यातील गो प्रेमींना मिळाली. त्यांनी ट्रक अडवण्याचा प्रयत्न केला. पण चालकांनी हुलकावणी देत सुसाट वेगाने भुसावळच्या दिशेने गेले. यामुळे भुसावळातील मानक पशु कल्याण अधिकारी रोहित महाले व गो प्रेमींना माहिती देण्यात आली. यावल नाक्यावर दोन ट्रक गो प्रेमींच्या उपस्थितीत अडवण्यात आल्या. शहर पोलिसांनी ट्रकची पाहणी केल्यावर त्यातून गायींची वाहतूक होत असल्याचे स्पष्ट झाले. दोन्ही ट्रक अकलूद येथील आसाराम बापू आश्रम गोशाळेत नेण्यात नेऊन गुरांची चारा-पाणी व उपचाराची व्यवस्था केली.




साप्ताहिक **दक्ष जळगाव** हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक राजेंद्र सुकलाल मिस्तरी यांनी लोकशाही ऑफसेट एम-१६९ एम.आय.डि.सी. जळगाव - ४२५००१ जि. जळगांव (महा.) येथे छापून प्लॉट नं. ३४, ब्लॉक नं. ४, मोहाडी रोड, जळगाव - ४२५००१ जि.जळगाव (महा.) येथे प्रसिध्द केले. **Title Code :- MAHMAR52287**

Weekly **Daksh Jalgaon** Ownded, printed, Published and Editor by Rajendra Suklal Mistari printed at Lokshahi Offset M-169 , M.I.D.C. Jalgaon - 425001Dist. Jalgoan (Maha.) and Published at Plot No. 34, Block No. 4, Mohadi Road, Jalgaon - 425001 Dist. Jalgaon (Maha.) **Title Code :- MAHMAR52287**